# प्रेस नोट दिनांक २१/०८/२०१८

# मौजमजेसाठी वाहन चोरी करणारा अल्पवयीन मुलगास उत्तमनगर पोलीसांनी पकडले

दिनांक- २०/०८/२०१८ रोजी उत्तमनगर पो स्टे तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक के. के. कांबळे, सपोफौ, वायदंडे, सपोफौ. वाळके, पो. हवा. २४१८ सुर्यवंशी, पो ना ६६७३ पाटील, पो शि ८१५९ ताकवणे, पोशि ८५९२ त्रिंबंके, पो शि ७४२४ ढमढेरे असे उत्तमनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शना खाली हद्दीमध्ये वाहन चोरीस प्रतिबंध करण्यासाठी पेट्रोलींग फिरत असताना १८/०० वा. चे सुमारास पोशि ८५९२ त्रिंबंके, पो शि ७४२४ ढमढेरे यांना त्यांचे बातमीदारमार्फत बातमी मिळाली की, एक अल्पवयीन मुलगा चोरीची हिरो होंडा पॅशन मोटार सायकल क्र. MH- 12- DN- 8090 ही घेवून नवभारत शाळा शिवणे येथे येणार आहे. त्याप्रमाणे पोलीस उपनिरीक्षक के. के. कांबळे यांनी स्टाफचे मदतीने सदर ठिकाणी सापडळा लावुन सदर बालकास शिताफिने पकडून त्याचे ताब्यातील नमूद मोटार सायकलबाबत विचारले असता त्याने सदर मोटार सायकल ही आशिर्वाद गार्डन सोसायटीचे पार्कीगमधून चोरल्याचे सांगितले. सदर मोटार सायकल चोरी बाबत उत्तमनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं. ६८/२०१८ भादवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. तसेच गुन्हा रजि नं. ६७/२०१८ भादवि कलम ३७९ मधील प्राप्त फुटेज पाहता सदर फुटेजमध्ये दिसत असलेला मुलगा व पकडलेला मुलगा हा तोच असल्याचे निष्पन्न झाले. त्याचेकडुन सदर गुन्हयातील मोटार सायकल बाबत चौकशी करता त्याने सदरची गाडी चोरल्याचे सांगीतले सदरची मोटारसायकल हस्तगत करुन किंमत रुपये ३०,०००/- च्या ०२ दुचाकी वाहने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एकुण २ गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले आहे. सदर अचारी बालकाकडे चौकशी करता मौजमजेसाठी वाहने चोरी करुन वापरत असल्याचे सांगितले. सदर अल्पवयीन बालक हा कोंढवे धावडे पुणे येथील एका शाळेत इ. १० वी मध्ये शिक्षण येत आहे. सदर अल्पवयीन बालकांस त्यांचे पालकांचे ताब्यात देण्यात आले असून गुन्ह्याचा तपास अद्याप सुरु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ १ पुणेशहर, मा. सहा. पोलीस आयुक्त डेक्कन विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली उत्तमनगर पो.स्टे पुणे चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक अनघा देशपांडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सतिश डहाळे, तपास पथकाचे पोउनि के.के.कांबळे, सपोफौ वायदंडे, पो.हवा. सुर्यवंशी,पो ना ६६७३ पाटील ,पोशि ७४२१ ढमढेरे, पोशि ताकवणे पोशि त्रिबके यांनी पार पाडली आहे.

ता. २१/०८/२०१८

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
उत्तमनगर पोलीस स्टेशन पुणे

Scanned by CamScanner